**नि.फौ.ख.क्र.१८०/२०२२**
**सरकार –वि–दादाराव व इतर**
**<u>निशाणी क्रमांक ३९</u>**

**<u>सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०३ ची साक्ष शपथेवर सुरू</u>** :–

माझे नाव :– गणेश सुरेश सोळंके
वय :– ३० वर्ष, व्यवसाय :– मजुरी,
राहणार :– शेगांव, ता.शेगांव, जि. बूलडाणा.

**<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू</u>** :–

१. मी आरोपींना ओळखत नाही. मी फिर्यादीला ओळखत नाही. मी सन २०२२ जिजामाता चौक येथे पानपट्टी चालवित होतो. आरोपी व फिर्यादी मध्ये काय घटना घडली हे मला माहिती नाही. माझ्यासमक्ष मारहानीची घटना घडली नाही. पोलीसांनी बयाण घेतल्याचे मला आठवत नाही.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्त्याच्या तोंडी विनंतीवरुन या साक्षीदाराला उलटतपासणी स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवाणगी देण्यात आली.)**

आता मला माझ्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला तो बरोबर नसून खोटा आहे. पोलीसांनी असे का लिहीले याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीचे वकील एस.जी. वानखेडे यांनी नाकारला**

फेरतपास नाही.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

स्वा/–
**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ०९.०६.२०२६.**

**माझे समक्ष,**

स्वा/–
**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ०९.०६.२०२६**